


डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
☎ २५८९८७६२/२५४३२१६५
ई-मेल : dsspune@vsnl.net

Sankalpaa Graphics Ph. 24357117

# गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या (भाग–८)

## गडगडत गेला भातगोळा



प्रकाशक:
डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
☎ २५८९८७६२
२५४३२१६५
ई-मेल : dsspune@vsnl.net

डोअर स्टेप स्कूल
५२/५३ जे.एस. म्युनसिपल स्कूल
नाना चौक, ग्रॅन्ट रोड
मुंबई ४००००७
☎ २३८२६३४३/२३८५९२०३

© डोअर स्टेप स्कूल

**किंमत रू.**

तिसरी आवृत्ती :
मार्च २००४
कव्हर :
बी. सुहासिनी
आतील चित्रे :
कॉम्प्युटर ग्रॅफिकस आणि
संपदा भानप, शमा जोशी व
बी. सुहासिनी

# गडगड, गडगड, गडगडत गेला भातगोळा बिळात शिरला

(जपानी गोष्टीवरून)

एक होते आजोबा आणि एक होती आजी. दोघेही आता थकले होते. हातून फारसं काम होत नसे. पण करणार काय ? घरची गरीबी. काम केलं तर पोटाला दोन घास मिळणार, नाहीतर नाही.

आजी सकाळी लवकर उठायची. आजोबांसाठी जेवण रांधायची,शिदोरी बांधून तयार ठेवायची. जेवणाची शिदोरी बरोबर घेऊन आजोबा दूर रानात जायचे. रानात आजोबांचं एक शेत होतं. लहानच, पण मेहनत करून पिकवलं तर दोघांना पुरेल एवढं पीक यायचं.



एक दिवस काय झालं, आजोबा नेहमीसारखे शेतावर गेले. सकाळभर काम केलं. दुपार झाली. ऊन तापलं. आता थोडं थांबावं. सावलीला बसावं, दोन घास खावे, दोन घोट पाणी प्यावं आणि मग कामाला लागावं, असा विचार करून आजोबा



एका झाडाखाली दगडावर बसले. घाम पुसला, हात धुतले आणि जेवणाची गठुळी मांडीवर ठेऊन गाठ सोडली.

आज आजीने केले होते भाताचे गोळे. (जपानमध्ये भातामध्ये थोडे तीळ, किंचीत मीठ घालून थोडे पाणी लावून भाताचे गोळे करतात. आपण जसं भाकरी पिठलं बांधून नेतो तसे जपानी लोकं भाताचे गोळे बांधून नेतात.) आजोबांनी गठुळी उघडली आणि एक गोळा उचलून घेतला. तोंडात घालणार तोच कसा कुणास ठाऊक पण गोळा हातातून सुटला आणि गडगडत जायला लागला. गोळा पकडण्यासाठी आजोबाही पाठोपाठ धावले. पण बघता बघता गोळा पडला बिळात आणि पाठोपाठ बिळातून जसं काही कोणीतरी गाणं म्हणावं तसा आवाज आला,

"गडगड गडगड गडगडत आला
भात गोळा बिळात शिरला
उंदीरमामांना आयताच मिळाला
ला ऽ ला ऽ ला ऽ ला"

गाणं ऐकून आजोबांना काही कळेना. आपण ऐकला तो आवाज खराच की भास ? मग त्यांनी आणखीन एक गोळा जमिनीवर टाकला. तोही गोळा असाच गडगडत गेला आणि बिळात जाऊन पडला. आणि काय गंमत परत आपला तोच आवाज, तसाच गाणं म्हटल्यासारखा,

"गडगड गडगड गडगडत आला
भात गोळा बिळात शिरला
उंदीरमामांना आयताच मिळाला
ला ऽ ला ऽ ला ऽ ला"





'वा !, काय मजेशीर गाणं आहे. परत ऐकूया.' असं म्हणून आजोबा बिळाजवळ गेले आणि एकेक करत सगळे गोळे बिळात सोडले. गोळा खाली पडला की आतून गाण्यांचा आवाज यायचा. हे आहे तरी

काय ते बघावं म्हणून आजोबा वाकून वाकून बिळात बघताहेत तो झोक जाऊन तेच बिळात पडले आणि घसरत घसरत आपले आत आत जातच राहिले.
हे काय होतयं ते आजोबांना कळेचना. एकदम भिती वाटली. पण करणार काय ?, थांबणार कसं ? आणि बाहेर तरी कसं निघणार ? असा विचार करताहेत तोच कानावर तसंच गाणं आलं-

“गडगड गडगड गडगडत आले
आजोबा आले, आजोबा आले
उंदीरमामांच्या घरात शिरले
घरात शिरले हो ऽऽऽ
घरात शिरले हो ऽऽऽ ”





आजूबाजूला अंधार. एकदम काहीं दिसेना. आजोबा डोळे चोळून बघताहेत तर छोटे छोटे उंदीर काम करता करता

गाणं म्हणताहेत. नुसती एकच धांदल उडली आहे. कोणी आजोबांचे भातगोळे उखळात घालून कुटताहेत, कोणी त्यांत गोड गोड साखरेचं सारण भरतंय, कुणी चुलीवर पाण्याचं पातेलं चढवतंय, कोणी तयार झालेले मोदकासारखे गोड गोड गोळे नीट ओळीनं मांडून चुलीवरच्या पातेल्यात उकडण्यासाठी ठेवताहेत. आपण मोदक करतो ना तसाच प्रकार.

आजोबांना पाहून सगळे उंदीर आजोबांना म्हणाले, “आजोबा, भातगोळे दिलेत त्याबद्दल आभार. आता बसा थोडा वेळ. जेवण तयारच आहे. आज तुम्ही आमचे पाहुणे. सगळयांनीच एकदम जेऊया.”

आजोबा आणि उंदीरमामा सगळयांनी अंगतपंगत केली. गोड गोड खाऊ खाल्ला. पोटभरून जेवले. मग उंदीरमामांनी



आजोबांभोवती फेर धरला आणि परत सगळे गाऊ लागले, नाचू लागले-

“गडगड गडगड गडगडत आला
भात गोळा बिळात शिरला......”

आजोबांना उंदरांचा नाच बघून खूपच गंमत वाटली. उंदरांबरोबर फेर धरून ते पण लागले नाचायला.

असाच किती वेळ गेला ते कळलचं नाही. आजोबांना एकदम घरची आठवण आली. ते उंदरांना म्हणाले, “खूप वेळ झाला. छान जेवण झाले. आतां मला घरी गेलं पाहिजे. आजी वाट पहात असेल.”

उंदीर म्हणाले, “बरं, छान झालं आलात. आता पुनः या. आणि ही घ्या आजीसाठी छोटी भेट.”



उंदरांनी आजीसाठी दिलेली छोटी भेट घेऊन आजोबा घरी आले. त्यांनी आजीला सगळी हकीकत सांगितली. आजी म्हणाली, “बघू,बघू, माझ्यासाठी काय दिलंय ?” आजोबांनी आजीला आजीची भेट दिली.



आजी उघडून बघते तर काय आत एक मोठा खुळखुळा. “खुळखुळा, आणि तो मला कशाला ?” असं म्हणत आजी खुळखुळा हालवते तर काय आतून आपले पडताहेत तांदूळ. पुनः हालवला तरी पुन्हा तेच. आजोबांनी हालवला, आजीने हालवला, पुन्हा पुन्हा हालवून पाहिला, पण आतून तांदूळ पडायचे काहीं थांबेना.



आता आजी आजोबांना तांदूळ पिकवण्याची गरज राहिली नाही. शरीर थकले तर कसं होणार अशी काळजी राहिली नाही.

कधी काहीं लागलं की खुळखुळा हालवायचा. तांदूळ मिळतील ते विकून पैसे मिळवायचे, लागेल ते आणायचे. कशाला काहीं कमी नाही. कोणाकडे काहीं मागायची गरज नाही.

खुळखुळा घेऊन आजी आजोबा सुखानं राहू लागले. मधूनच आजोबांना उंदरांची आठवण यायची, उंदरांचं गाणं आठवायचं. मग ते मनाशीच गुणगुणायचे-

"गडगड गडगड गडगडत आला
भात गोळा बिळात शिरला"......

रूपांतरः रजनी परांजपे



# आमची पुस्तके

अ-गट
- पुस्तकमाला भाग-१ (मुळाक्षरे)
- पुस्तकमाला भाग-२ (आकार)
- पुस्तकमाला भाग-३ (ईकार)
- पुस्तकमाला भाग-४ (उकार)
- पुस्तकमाला भाग-५ (एकार)
- पुस्तकमाला भाग-६ (ऐकार)
- पुस्तकमाला भाग-७ (ओकार)
- पुस्तकमाला भाग-८ (औकार)

ब-गट
- मुळाक्षरांचे पुस्तक
- कान्याचे पुस्तक
- वेलांटीचे पुस्तक
- उकारांचे पुस्तक
- एका मात्रेचे पुस्तक
- दोन मात्रांचे पुस्तक
- ओकाराचे पुस्तक
- औकाराचे पुस्तक

- जोडाक्षरांचा सराव - २ भाग
- कोडीच कोडी मजाच मजा - २ भाग
- लहान शब्दकोश
- गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या
- हस्तपुस्तिका
- बहिस्थ परिक्षेसंबंधीची माहिती
- वयाचा दाखला कसा काढावा ?
- शालेय वाचनालय चालवताना